सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२६/347
दिनांक 05 FEB 2026

**प्रति,**
**प्राचार्य,**
सर्व पदविका ,पदवी व पदव्युत्तर पदवी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय : डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सुधारीत दराने मिळणाऱ्या निर्वाह भत्याबाबत...**
**संदर्भ :** उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन निर्णय क्र.पनियो-२०२२/प्र.क्र.१८६/तांशि-४ दिनांक ०५.०१.२०२४

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन , संदर्भिय शासननिर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत सुधारीत दराने निर्वाहभत्ता मिळतो तसेच संस्थाना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून डीबीटी पोर्टलवर संस्थेचे ठिकाण खालील कोणत्या वर्गातील आहे ते निवडल्यानंतर खालीलप्रमाणे निर्वाहभत्ता मंजूर होतो.

| अ.क. | भत्ता | मुंबई शहर,मुंबई उपनगर,नवी मुंबई,ठाणे,पुणे,पिपरी चिंचवड,नागपूर या शहरात उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | इतर महसुली विभागीय शहरातील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | तालुका ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | भोजन भत्ता | ३२,०००/- | २८,०००/- | २५,०००/- | २३,०००/- |
| २ | निवास भत्ता | २०,०००/- | १५,०००/- | १२,०००/- | १०,०००/- |
| ३ | निर्वाह भत्ता | ८,०००/- | ८,०००/- | ६,०००/- | ५,०००/- |
| | **एकूण रक्कम** | **६०,०००/-** | **५१,०००/-** | **४३,०००/-** | **३८,०००/-** |

तथापि, विभागीय कार्यालयाचे डीबीटी लॉगीनमध्ये डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेच्या अर्जांची पडताळणी केल्यावर असे लक्षात आले की, संस्थानी आपल्या डीबीटी पोर्टलवरील डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेच्या लाभाकरीता संस्थेचे ठिकाण वरील दिलेल्या तक्यानुसार न निवडता चुकीच्या वर्गाची निवड केलेली आहे. त्यामुळे सदर संस्थेतील विद्यार्थ्यांना जास्त दराने निर्वाहभत्त्याचा लाभ मंजूर होत आहे. ही अतिशय गंभीर आर्थिक नियमितता आहे व शासनाच्या वित्तीय औचित्त्याच्या नियमाच्या विसंगत बाब आहे.

**तरी, याबाबत सर्व संस्थेच्या प्राचार्य यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी स्वत: डीबीटी पोर्टलवरील डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेच्या लाभाकरीता वरील तक्त्यामध्ये दिलेल्यानुसार संस्थेचे ठिकाणाचा योग्य वर्ग निवडावे व आपल्या संस्थेचे ठिकाण वरील तक्त्यामध्ये दिलेल्यानुसार ज्या वर्गात येते व त्यानुसार मिळणारा लाभ यामध्ये अनियमितता होणार नाही व त्यासाठी आपण प्राचार्य म्हणुन स्वत: जबाबदार राहणार असल्याचे हमीपत्र सादर करणे अनिवार्य राहील,याची नोंद घ्यावी.**

संस्थेमार्फत हमीपत्र सादर केल्यानंतरच आपल्या संस्थेच्या डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेच्या अर्जांची पडताळणी करण्यात येईल तसेच संस्थाकडून चूकीची माहिती निवडल्यामुळे विद्यार्थ्यांना जास्त लाभ मिळाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी ही संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

**सहपत्र** : वरीलप्रमाणे

(डॉ.वि.रं.मानकर)
**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

# हमीपत्र

मी श्री. ------------------------------------------------------- प्राचार्य संस्थेचे नाव व पत्ता (तालुका/जिल्हा/ पिन कोड सह ) -------------------------------------------------------------------------------------------------------- डीटीई कोड ----------------- प्रतिज्ञापूर्वक खालीलप्रमाणे हमीपत्र देत आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,शासन निणर्प क्र.पनियो-२०२२/प्र.क्र.१८६/तांशि-४ दिनांक ०५ जानेवारी,२०२४ चे पुर्णपणे अवलोकन केलेले आहे. सदर शासन निर्णयानुसार संस्थेचे ठिकाण १) **महसुली विभागीय शहर व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्र २) जिल्ह्यांचे ठिकाणी ३) तालुका ठिकाण** (लागू असेल ते ठेवावे) या वर्गातील आहे. त्यानुसार डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेच्या लाभाकरीता संस्थेतील विद्यार्थ्यांना रु ---------------- एवढा लाभ अनुज्ञेय आहे.

सदर शासननिर्णयानुसार संस्थेच्या ठिकाणाबाबत चूकीचा वर्ग निवडल्यामुळे विद्यार्थ्यांना जास्त लाभ मिळाल्यास, विद्यार्थ्यांना मिळालेला जास्तीचा लाभ शासनास जमा करण्याची जबाबदारी ही संस्थेची राहील. .

करीता हमीपत्र सादर करीत आहे.

स्थळ : प्राचार्य (नाव,स्वाक्षरी,शिक्का)

दिनांक : संस्थेचा शिक्का